IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Journal
ISSN 2455-4375

# महाराष्ट्रातील वाढते शहरीकरणामुळे निर्माण समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**असो. प्रो. डॉ. संतोष मेंढेकर**
समाजशास्त्र, विभाग प्रमुख,
रेणूका कॉलेज, बेसा, नागपूर
मो.नं. 9860015025, 8788968622
Email: santoshmendhekar@gmail.com

---

***सारांश :***

*प्रस्तूत संशोधनाच्या माध्यमातून २१ व्या शतकात भारतातील महाराष्ट्रराज्याचे वाढते शहरीकरणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. एकविसाव्या शतकात महाराष्ट्रात शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. महाराष्ट्राच्या शहरीकरणाची टक्केवारी ४२.२ टक्के होती, ती २०३० पर्यंत ५८ टक्के होण्याची शक्यता आहे. पुढील काही दशकांत शहरीकरणाचा वेग अभूतपूर्व असणार आहे असे भाकीत आहे. २०३० पर्यंत या महाराष्ट्रात शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढणार आहे. महाराष्ट्र भारतातील चवथ्या क्रमांकाचे शहरीकरण झालेले राज्य आहे. १९६१ ते २००१ या कालावधीत महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्या दुप्पट झाले आहे. महाराष्ट्रात १० लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ७ शहरे आहेत आणि ती भारतातील इतर कुठल्याही राज्यापेक्षा सर्वाधिक आहेत. १९९२ च्या ७४ व्या घटना दुरूस्ती कायद्याने हे चित्र बदलले. या कायद्याने तीन स्तरीय सरकार दिले. ज्यात नगरपालिका या शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेला अनेक अधिकार आणि कार्यकक्षा प्राप्त झाल्या. देशातील वाढत्या शहरीकरणाला ही एकप्रकारे राजमान्यता होती आणि न्याय होता. महाराष्ट्रातील वाढत्या लोकसंख्येचा आजच्या शहरांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होणार आहे. या सर्व परिणामांचा सूक्ष्मपणे विचार करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण शहरीकरण आणि त्याचा वेग यांना थांबवणे आता जवळपास दुरापास्त आहे आणि देशाच्या विकासाच्या दृष्टीने शहरीकरण आवश्यकसुद्धा आहे. शहरीकरणाला चांगली बाजूही आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास हा शहरीकरणावरही अवलंबून असतो. एवढेच नसून देशाच्या दरडोई उत्पन्न वाढीमध्ये शहरीकरणाची भूमिका महत्त्वाची आहे.*

**बीज शब्द:** शहरीकरण, नागरीकरण, संस्कृतीकरण, शहरीकरणाचे परिणाम, शहरीकरणाचे कारणे.

---

**प्रास्ताविक :**

औद्योगिकरणामुळे घडून येणारा पहिला महत्वपूर्ण बदल म्हणजे शहरीकरण होय. २००१ ते २०११ या दशकात भारतात शहरीकरणाचा वेग लक्षणीय वाढला. या कालखंडात भारताची शहरी लोकसंख्या ९.०९९ कोटींनी वाढली, तर ग्रामीण लोकसंख्या ९.०४७ कोटींनी वाढली, भारतात शहरात राहाणाया लोकांची संख्या २००१ मध्ये २७.७२ टक्के होती ती २०११ मध्ये ३१.१६ टक्के वर पोहोचली. याच काळात महाराष्ट्रातील शहरीकरण ४७.७५ टक्के इतके होते. भारतातील शहरीकरणात महाराष्ट्राचा चौथा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतरीत होणाया लोकांची संख्या प्रचंड वाढली आहे. शहरातील नोकरीच्या संधी व झगमगाट याकडे आकर्षीत होऊन मोठ्या प्रमाणावर ग्रामीण तरूण शहराकडे स्थलांतरीत होत आहे. यामुळे अनेक तरुणांना नोकऱ्या मिळाल्या, हे खरे असले तरी, त्यामुळे

शहरीकरणाची समस्या मात्र खूपच वाढली आहे. गावातील लोकसंख्या शहराकडे स्थलांतरीत झाल्यामुळे शहरे फुगू लागली आहेत. सद्या महाराष्ट्रात मुंबई शहरात एक कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या आहे. पण २०३० पर्यंत मुंबईची लोकसंख्या वाढून एक कोटींच्यावर जाईल. एकीकडे शहरे मारूतीच्या शेपटासारखी वाढतच असतानाच, दुसरीकडे ग्रामीण भागातही एकूण लोकसंख्येचा अर्धा भाग राहत आहे या वाढत्या शहरीकरणमुळे महाराष्ट्राच्या विकासातील मोठा अडथळा निर्माण झालेला आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

महाराष्ट्राच्या वाढत्या शहरीकरणात राहणाऱ्या नागरिकांचे राहणीमान, त्यांना मिळणाऱ्या सोई, सुविधा आणि त्यांच्या मोबदल्यात मोजावी लागणारी किंमत आणि वाढत्या शहरीकरणात निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नातून सदर शोध निबंधाचा विषयाचा जन्म झालेला आहे.

१. महाराष्ट्रातील वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांचा शोध घेणे,

२. महाराष्ट्राच्या शहरीकरणातून निर्माण झालेल्या समस्यांवरील उपाययोजना सुचविणे.

३. २१ व्या शतकातील शहरीकरणातील मानवी हस्तक्षेपाचा शोध घेणे.

४. महाराष्ट्राच्या शहरीकरणातून पर्यावरण विकासाला चालना देणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. महाराष्ट्रातील वाढते शहरीकरण ही सार्वत्रिक स्वरूपाची अव्याहतपणे चालणारी प्रक्रिया आहे.

२. महाराष्ट्राचा आर्थिक विकास हा शहरीकरणावरही अवलंबून असतो.

३. २१ व्या शतकात महाराष्ट्रात शहरीकरणात विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत.

४. शहरीकरण म्हणजे सर्वसमावेशक प्रगतीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक चालक शक्ती असल्याचे मानले जाते.

**संशोधनाच्या पध्दती :**

प्रस्तूत शोध निबंधासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. तसेच कार्यालयातील माहितीचा आधार घेतलेला आहे. प्रस्तूत लेखनासाठी संख्याशास्त्रीय पद्धती व संदर्भ संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्रस्तून संशोधनासाठी संशोधन प्रबंध, वृत्तपत्रातील बातम्या, नगरपालिका वार्षिक अहवाल, प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली, सरकारी व पर्यटन अहवाल, नियतकालिके, गॅझेटिअर्स, शब्दकोश व विविध लेखांचा आधार घेतलेला आहे व सर्वात शेवटी संदर्भग्रंथाची सर्वसमावेशक यादी दिलेली आहे.

**शहरीकरणातून निर्माण होणाया समस्या :**

भारतात ५००० पेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या वसाहतीला शहर म्हणतात. महाराष्ट्रात गावाची सर्वांगीण प्रगती होऊन उद्योगधंदे, व्यापार व शेती व्यतिरिक्त व्यवसायामध्ये लोकांचा जास्तीत जास्त सहभाग होऊ लागला. तसेच अनेक सेवा, सवलती, सोई निर्माण होऊ लागल्या आणि शहराचा मुखवटा चढू लागला की त्यास शहरीकरण असे म्हणतात.२१व्या शतकात महाराष्ट्रात वाढत्या शहरीकरणामुळे ज्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यातील महत्त्वाच समस्या खालीलप्रमाणे...

**१. लोकसंख्येचा भस्मासूर :**

महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये भरमसाट, अनिबंध आणि अमर्याद लोकांची वाढ ही एक प्रमुख समस्या बनली आहे. शहरांमध्ये नोकरी, रोजगार, करमणूक व उपजीविकेची साधने उपलब्ध होतात. या आशेने

मोठ्याप्रमाणात ग्रामीण भागातून शहरांकडे लोकांचे तांडे स्थलांतर करीत असतात. त्यामुळे शहरांच्या लोकसंख्येत भरमसाट वाढ होणे, ही अपरिहार्य बाब आहे. त्यामुळे शहरांची लोकसंख्या घनता प्रचंड वाढली आहे. शहरातून लोकसंख्येची घनता उच्चांकी आहे. मुंबई शहरामध्ये दर चौ. किमीला ४५७५७ तर मुंबई उपनगरामध्ये १२६४० इतकी लोकसंख्यावाढ ही संपूर्ण भारतासमोरील एक बिकट समस्या बनली आहे. यावरून महाराष्ट्रातील शहरांच्या वाढत्या लोकसंख्येची समस्या किती गंभीर आहे हे स्पष्ट होते. कार्ल मार्क्सच्या मते लोकसंख्येची वाढ माणसाच्या प्रजोत्पादन क्षमतेवर अवलंबून नसून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा तो परिणाम आहे. कारण मजुरांचा पुरवठा कमी त्यामुळे मजुरांचे जीवन निकृष्ट व लोकसंख्या झपाट्याने वाढली. भांडवलशाही टिकवण्यासाठी लोकसंख्या घटक महत्त्वाचा आहे.

**२. पूर्णवसन आणि स्थलांतराची समस्या :**

महाराष्ट्रातील शेतीतील घटते उत्पन्न व गावातील रोजगाराची कमतरता यामुळे लोक मोठ्यमाणावर शहरात स्थलांतरीत होत आहेत. शहरांमधील वाढत्या लोकसंख्येमुळे प्रशासनावरील ताण प्रचंड वाढत असल्यामुळे शहरे बहरली आहेत. केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांनी या समस्येचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. शहरीकरण वाढीच्या प्रक्रियेत स्थलांतर ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. महाराष्ट्रातील स्थलांतरामध्ये पुरूषांचे प्रमाण कमी असते. स्थलांतरामध्ये स्त्री—पुरूष प्रमाण असमान असते. १९९१ मध्ये महाराष्ट्रामध्ये १०.३ टक्के स्त्रियांनी तर २७.६ टक्के पुरूषांनी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर केले. पर्यायाने शहरातील सर्व सोई सुविधांवरील ताण वाढत चालला आहे.

**३. झोपडपट्टया आणि गलिच्छ वस्त्या :**

स्वच्छता ही महाराष्ट्रातील शहरी भागात, विशेषत: झोपडपट्टीतील आणि अनधिकृत वसाहतींमधील तर पाचवीला पुजलेली आहे. यामुळे अनेक प्रकारच्या अस्वच्छतेमुळे पसरणाऱ्या रोगराई, जसे की डायरिया, मलेरिया इत्यादीचा प्राधुर्भाव होतो. असुरक्षित कचरा विल्हेवाट ही शहरी क्षेत्रातील एक गंभीर समस्या आहे आणि कचरा व्यवस्थापन तर एक कायम आव्हान आहे. पर्यायाने या वस्त्यांमध्ये रस्ते, पथदिवे, गटर, सांडपाणी, दवाखाने, शाळा, आरोग्य, गुन्हेगारी, दारिद्रय असे अनेक बिकट प्रश्न निर्माण होतात, झोपडपट्टयांमधील मानवी जीवनाचे विदारक चित्र रेखाटताना एम. के. गुप्ता म्हणतात. माानवी विषयास अयोग्य अशी घरांची गर्दी असलेली वस्ती म्हणजे झोपडपट्टी किया गलिच्छ वस्ती होय, महाराष्ट्रातील अनेक शहरातील शहरीकरणावरून गलिच्छ वस्त्या किंवा झोपडपट्टया आणि त्यात राहणारा समाज व त्यांचे राहणीमान, आरोग्य ही प्रचंड मोठी समस्या म्हणून भविष्यकाळात उभी राहणार आहे.

**४. जागेची समस्या :**

औद्योगिकरणामुळे रोजगार, व्यापार, व्यवसाय अर्थात उपजिविकेची साधने उपलब्ध होतात. त्यामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून लोकांचे लोंढे शहराकडे पाहू लागतात. शहरांचा क्षेत्रीय विकास मर्यादित असल्यामुळे एका मोठ्या संख्येने आलेल्या लोकाना सामावून घेण्यास शहरे असमर्थ असल्याने प्रत्येक कुटुंबास राहणेस जागा उपलब्ध होणे केवळ अशक्य असते. राहणेसाठी जागा मिळावी याकरिता प्रत्येकजण प्रयत्नशील हा असतो. आणि त्यातूनच जागेच्या किमती वाढतात, परंतु भविष्य काळात तो अधिक गंभीर व जटिल होणार यात निममात्र शंका नाही. अर्थात महाराष्ट्रात शहरीकरणामुळे निवासी जागेचा प्रश्न अधिकाधिक बिकट बनत चालला आहे.

**५. प्रदूषणात वाढ :**

महाराष्ट्रातील वाढत्या शहरीकरणामुळे मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्ती ओढवून धोकादायक परिस्थिती आणि जोखीम निर्माण होते आहे. महाराष्ट्रात शहरी भागात उष्णता निर्माण वाढते आहे. औद्योगिकरणामुळे विविध रासायनिक व इतर उद्योगधंदे शहराच्या ठिकाणी निर्माण होतात व त्यातून बाहेर पडणारे द्रवपदार्थ, दूषित पाणी, रसायने, सरळ नद्या, नाले, खाड्या व समुद्रायाप्रमाणे सोडले जाते. पर्यायाने प्रचंड प्रमाणात जलप्रदूषण होते. त्यातून वापराचे प्रचंड प्रमाणात पेयजल समस्या निर्माण होते. त्याचबरोबर शहरामध्ये असणाऱ्या बसेस, ट्रक, टॅक्सी, स्कूटर, मोटर सायकली, रेल्वे इ. धुराड्यातून बाहेर पडणाया धुराचे प्रमाण प्रचंड असते. ध्वनीप्रदूषणाच्या बाबतीत थोड्याफार कारणासाठी तीच परिस्थिती दिसून येते. अव्याहतपणे चालू असणारे लाऊड स्पीकर्स, रेडिओ, दूरदर्शन, टेपरेकॉर्डर, कर्कश असे वाहनांचे हॉर्नस, गिरण्या कारखान्यांचे भोंगे, वाहनांचे आवाज, सायरन्स फटाके यामुळे शहरामध्ये ध्वनीप्रदूषण देखील भरपूर असते, अशा प्रदूषण समस्येमुळे मानव जीवन धोक्यात आलेले आहे.

**६. सामाजव्यवस्थेत नियंत्रणाचा प्रश्न :**

महाराष्ट्रातील शहरीकरणामुळे उपलब्ध होणाया उपजिविकेच्या साधनांमुळे व इतर कारणांमुळे आकर्षिक होवून अनेक प्रदेश, प्रांतातील भिन्न भाषिक, वांशिक व विविध जाती धर्माचे शहराच्या ठिकाणी एकत्र येतात. यामुळे शहरातील लोकसख्येमध्ये सापेक्ष निरपेक्ष पद्धतीने वाढ होवून नगरे अथवा मोठी निर्माण होतात, तेथे विविध जाती पंथाचे लोक एकत्र येतात या कॉसमॉपॉलिटन गुधर्मामुळे तेथील लोकांच्या आवडी–निवडी दृ ष्टीकोन, सामाजिक मूल्य व वर्तणूक बदलते. त्यातून विविध सामाजिक प्रश्न व समाज नियंत्रणाच्या समस्या निर्माण होतात

**७. आरोग्य, शैक्षणिक, आणि राजकीय समस्या :**

शिक्षण आणि आरोग्य हे मानवी विकासाचे (Human Development) महत्त्वाचे संकेतक (indicators) मानले गेले आहेत. महाराष्ट्रात वाढत्या शहरीकरणामुळे शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही बाबतीत ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी गरीबांची आरोग्य स्थिती जास्तच प्रतिकूल होत आहे. सरकारी शिक्षण व्यवस्थेचे देखील असेच संकुचन होत चालले आहे त्यामुळे लोकांना खाजगी शिक्षण संस्थांवर आवलंबून राहावे लागत आहे. मर्यादित जागा आणि उच्च शुल्क आकारणी यांना तोंड द्यावे लागते आहे. सार्वजनिक शैक्षणिक संस्थांची स्थिती निराशाजनक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक शहरात हिवताप, मलेरिया, डेंगू, गॅस्ट्रो, पोलिओए चीकन गुनीया यासारखे रोगांनी पछाडलेल्या लोकवस्त्या दिसून येतात. घनदाट वस्त्यांमुळे खुली व मोकळी हवा अजिबात मिळत नाही. तसेच शुद्ध व पुरेसे पाण्याचा अभाव, सरकारी रूग्णालयांची कमतरता, खाजगी रुग्णालयांचे न परवडणारे दर यातून कुपोषण, ॲनिमिया, बांसारखे रोग निर्माण झाले आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस लोकांची कमतरता कमी होताना दिसते.

**८. प्रशासकीय व नागरी सुविधांची समस्या :**

महाराष्ट्रातील शहरीकरणामुळे ज्या अनेक समस्या निर्माण होतात त्यामध्ये नागरिकांना अत्यंत उपयोगी व दैनंदिन जीवनाशी निगडीत अशी गोष्ट म्हणजे प्रशासकीय व नागरी सोई सुविधा होय, शहरांच्या अक्राळ विक्राळ वाढणाऱ्या लोकसंख्येचे पूरक अशा प्रशासकीय व नागरी सुविधांची पूर्तता करणे ही एक समस्या आहे. जरी महाराष्ट्र शासनाने पुर्तता केली तरी त्यास मर्यादा असतात. शहराची लोकसंख्या दिवसा गणिक वाढत असते. त्यामुळे या सर्व प्रशासकीय सेवा कोलमडून पडतात. वैद्यकीय सुविधा, सरकारी दवाखाने,

निबंधकाची कार्यालये, विवाह व जन्म मृत्यू नोंदणी कार्यालये, न्यायालये, रजिस्टा ऑफीस, पोस्ट ऑफीस, सरकारी बँका, वित्तीय संस्था, टेलीफोन विभाग, विद्युत व पाणीपुरवठा विभाग, नगर रचना कार्यालये इ. प्रशासकीय व नागरी सोईसुविधा कोलमडून पडतात. त्यातून जनजीवन विस्कळीत होते

**९. शहरी गून्हेगारीची समस्या :**

महाराष्ट्रातील शहरी गुन्हेगारी हे देखील एक मोठे आव्हान आहे. वाढत्या शहरीकरणाबरोबर दाट लोकवस्त्या, अपुऱ्या पायाभूत व्यवस्था, परवडणारी घरे, पूर, पर्यावरण, झोपडपट्ट्या, गुन्हेगारी, दाटीवाटी आणि दारिद्र असे अनेक प्रश्न तयार होतात. त्यामध्ये गंभीर गुन्हे, साधारण गुन्हे, अर्थिक गुन्हे, यौन प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश करता येईल. बेकारी, चंगळवाद परिस्थिती अशा अन्य कारणांमुळे नागरी समाजातील तरूण वर्ग गुन्हेगारीकडे वळतो. ही गुन्हेगारी एवढ्या व्यापक प्रमाणात आढळते की त्यावर नियंत्रण करणे पोलिस, सुरक्षा व्यवस्था व सामाजिक संघटनांना देखील अशक्यप्रत बनले आहे. अर्थात महाराष्ट्रातील वाढत्या शहरीकरणामुळे दारिद्र गुन्हेगारी, वेश्यावृत्ती इ. समस्या निर्माण होतात.

**१०. मनोरंजनाच्या साधनांचा अभाव :**

महाराष्ट्रातील आजच्या शहरांमध्ये मनोरंजनाची विविध साधने उपलब्ध असताना दिसतात. त्यामध्ये चित्रपटगृहे, नाट्यगृहे, बगीचे, बालोद्यान, विविध वस्तूंचे प्रदर्शन, ग्रंथालये, वाचनालये, वस्तूसंग्रहालये इ. चा त्यामध्ये समावेश होतो. परंतू या सर्व सोई सुविधा अपुऱ्या पडतात व सर्व ठिकाणी तुडुंब गर्दी दिसते. त्यामुळे ठराविक लोकांनाच त्याचा लाभ मिळतो. शहरांमधील करमणूक साधनांचे दर भरपूर असतात. ते सामान्य लोकांना परवडत नाहीत. तसेच अशी करमणूक केंद्रे, क्रीडांगणे शहरापासून दूर अंतरावर असतात. त्यामुळे तीथपर्यंत गरीब व सामान्य माणूस पोहचू शकत नाही व पर्यायाने करमणूकीच्या साधनांपासून वंचित राहतो व त्याचा परिणाम त्याच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असतो. त्यातूनच एकाकीपणा, मनोरंजन, ताणतणाव वाढतात. अशा वंचित राहतो परिणाम त्याच्या व मानसिक आरोग्यावर होत व त्याचा शारीरिक असतो. त्यातूनच एकाकीपणा, मनोरंजन, ताणतणाव वाढतात. अशा प्रकारच्या समस्या मनोरंजनाच्या साधनाअभावी निर्माण होतात.

**उपाययोजना :**

२१ व्या शतकात महाराष्ट्रातील वाढत्या शहरीकरणामुळे येणाऱ्या काळात नवीन आव्हाने निर्माण होणार असून पर्यावरण, कचरा तसेच सांडपाण्यामुळे होणारे प्रदूषण यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील या समस्यांचे निवारण करण्याचा एक उपाय म्हणजे येत्या २० वर्षातपर्यंत मोठ्या शहरांजवळच्या अनेक निमशहरांना विकसित केले पाहिजे. याशिवाय पर्यायी रोजगार व्यवस्था ग्रामीण व निमशहरी भागात करून तरूणांसाठी काही खास योजना आखल्या पाहिजेत.महाराष्ट्रातील मुंबई आणि पुणे या शहरांव्यतिरिक्त नाशिक, कोल्हापुर, औरंगाबादए नागपूर या शहरांकडे, त्यांच्या विकासाकडे लक्ष देवुन, कश्या ही वाढणाऱ्या दोन शहरातील लोकसंख्येला आणि रोजगारांना तिकडे वळविल्या पाहिजे.

महाराष्ट्रातील वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर अनधिकृत बांधकामे नियमत व्हावीत म्हणुन पिंपरी चिंचवड खुप वर्षे झगडत आहे, आधी २००९ पर्यंतचे बांधकाम नियमित करावे ही मागणी होती, नंतर २०१२ पर्यंतची आणि आता २०१६ पर्यंतची बांधकामे नियमीत व्हावीत आणि या सर्वांना स्थानिक संस्था, आपले नगरसेवक, आमदार आणि पर्यायाने सरकार ही तितकेच जबाबदार आहे. अनधिकृत बांधकामांचे व्यवहार थांबविने गरजेचे असून सर्व नियोजन कार्यालये, प्राधिकरण, महानगर कार्यालय आणि नोंदणी कार्यालये

संगणिकिय प्रणालीद्वारे जोडले जाणे आवश्यक आहे. नोंदणीप्रणाली सर्व कार्यालयांना जोडुन अनधिकृत बांधकामांना अटकाव करण्यात आल्यास ती एक क्रांतीकारी सुधारणा असेल पण सरकार या मध्ये अपयशी ठरलेली आहेत. महाराष्ट्रात आज शहरीकरणाच्या समस्येसाठी स्मार्ट सिटी योजना अग्रस्थानी होती, त्यात भारतातील १०० शहरांची निवड करण्यात आली होती. त्यात महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक या पाच शहरांच्या विकासासाठी १,०१,९८१ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रात शहरीकरण वाढते आहे या शहरीकरणाला टाळता येत नाही. हे विकसीत देशाच्या झालेल्या विकासावरून समजते. वाढत जाणारे शहरीकरण संकट किंवा आव्हान नसून विकासाची एक संधी आहे हा व्यापक दृष्टीकोण सरकारने स्विकारून शहरी विकासाचे धोरण आखले पाहिजेत. शहरीकरणामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारतो. मोठ्यप्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. त्याचबरोबर आजूबाजूच्या खेड्यांचा सुद्धा विकास होत असतो. परंतु विकासाबरोबरच शहरीकरणाची काळी बाजूसुद्धा ठळकपणे दिसून येते. २१ व्या शतकातील महाराष्ट्रात शहरीकरणाच्या समस्येचा अभ्यास करतांना खालील निष्कर्ष महत्त्वाचे आहे.

१. महाराष्ट्रात झालेले शहरीकरण ही आधुनिक काळातील न टाळता येणारी अशी आवश्यक बाब बनली आहे. ज्या अर्थी शहरीकरणामुळे देशाच्या प्रगतीचे मोजमाप होते. तसेच विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. त्या अर्थी नागरीकरण म्हणजे एक प्रकारची इष्टापत्तीच म्हणावी लागेल.

२. महाराष्ट्रातील शहरीकरण बहुअंगी, परिवर्तनशील व पतीशील प्रक्रिया असून या संकल्पनेमध्ये उद्योगशीलतेमुळे ग्रामीण भागाचे, तेथील व्यवसायाचे, उत्पादनाचे व एकूण संपूर्ण जीवनपद्धतीचे आमूलाग बदल म्हणता येईल.

३. २१ व्या शतकातील महाराष्ट्रात झालेल्या वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोकजीवन, विचारधारा, लोकांचे दृष्टिकोन, सामाजिक मूल्य वर्तणूक यामध्ये झालेले परिवर्तन महत्त्वाची भूमिका बजावतात.

४. महाराष्ट्रात शहरीकरणाचा पाया औद्योगिकरणामध्ये आहे म्हणून शहरीकरण हे ग्रामीण वसाहतींचे, व्यवसायाचे व उत्पादनाचे आणि एकूण सामाजिक जीवन पद्धतीचे स्थलांतर असते असे म्हणता येईल.

५. शहर ही अर्थव्यवस्थेची मुख्य केंद्रे असतात म्हणून २१ व्या शतकात वाढत्या औद्योगिकरणामुळे लोकांना रोजगार संधी उपलब्ध होईल, पण त्यात अंतर्भूत असलेल्या समस्या कमी करण्यासाठी प्रभावीपणे उपाययोजनांचा अवलंब केल्यास सुधारणेतून सर्वांगीन विकासाचा पाया घातला जाईल.

**संदर्भ ग्रंथाची यादी :**


- खडसे भा. कि., २००४), भारतीय सामाजिक समस्या, शिवाजी विद्यापीठ: कोल्हापूर, प्रथमावृत्ती पृ. १५४
- घारपुरे विठ्ठल, (२०१५), पर्यावरणशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड के. पब्लिशर्स, प्रथमावृत्ती: नागपूर, पृ. ३०
- बोंगाळे शोभा, (२०११), शहरीकरणाच्या समस्या आणि नगरपालिकेचे राजकारण, एम. फिल. अप्रकाशित लघु शोध प्रबंध,
- नागपुर विद्यापीठ: नागपूर. पृ. २१०.

- पालीवाल दीपक, (२००६), समाजशास्त्रीय सिद्धांत, उत्तराखण्ड मुक्त विश्वविद्यालय, हल्दानी, पृ. ४८
- वैद्य वसंत, (२००४), भारतीय सामाजिक समस्या, कल्पना प्रकाशन, नांदेड, पृ.६२
- आगलावे प्रदीप, समाजशास्त्र विषय संकल्पना, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर, २०२८ पृष्ठ क्र.५१.
- www-loksatta-com/vasturang&news/11th July २०१३, पृष्ठ क्र. ञ्य.
- https://mr-vikaspedia-in/social&welfare. पृष्ठ क्र. ०१
- http/narendraoshiblog-blogspot-in/2013/08 पृष्ठ क्र. ०२.
- www-loksatta-com/vasturang&news/11th July 2013, पृष्ठ क्र ०३
- नवभारत टाईम्स – २८ मे २०२०